# डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्र, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

# आणि

# बहिर्जी स्मारक महाविदयालय वसमतनगर जि. हिंगोली

**यांच्या संयुक्त विद्यमाने बहुविद्याशाखीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन**

## विषय : " मराठवाडयाचा विकास : नवे दृष्टिकोन "

**प्रति,**

**मा. प्राचार्य/विभागप्रमुख/प्राध्यापक/संशोधक/शिक्षणतज्ज्ञ/संपादक/लेखक/सामाजिक कार्यकर्ता.**

...............................................................................................

..............................................................................................

**विषय : " मराठवाड्याचा विकास: नवे दृष्टिकोन " या विषयावर बहुविद्याशाखीय राज्यस्तरीय स्तरावरील चर्चासत्र आयोजित करण्याबाबत.**

महोदय / महोदया,

मराठवाडा हा ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक व भौगोलिकदृष्ट्या समृद्ध प्रदेश आहे. तथापि, शेती, जलव्यवस्थापन, उद्योग, रोजगार, शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा, महिला सक्षमीकरण, पर्यावरण, पर्यटन आणि मानवी विकास या विविध क्षेत्रांमध्ये या प्रदेशासमोर अनेकविध आव्हाने आहेत. मराठवाड्याच्या सर्वांगीण व शाश्वत विकासासाठी या प्रश्नांचा व्यापक, शास्त्रीय आणि बहुआयामी दृष्टिकोनातून अभ्यास करण्याची आवश्यकता आहे.

या पार्श्वभूमीवर "मराठवाड्याचा विकास: नवे दृष्टिकोन "या मध्यवर्ती विषयावर राज्य स्तरावरील चर्चासत्र आयोजित करण्याचे निश्चित झाले आहे.या राज्यस्तरीय चर्चासत्रामध्ये देशातील विविध विद्यापीठे व महाविद्यालयीन प्राध्यापक, संशोधक, शिक्षणतज्ज्ञ, विविध सामाजिक; सांस्कृतिक व विकासोन्मुख चळवळीचे पदाधिकारी व कार्यकर्ते, प्रशासकीय अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक, कृषी व उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ तसेच विद्यार्थी सहभागी होऊन मराठवाड्याच्या विकासाच्या विविध पैलूंवर विचारमंथन करतील. संशोधनाधारित मते, अनुभव, नाविन्यपूर्ण कल्पना आणि धोरणात्मक शिफारशींची देवाणघेवाण हा या चर्चासत्राचा प्रमुख उद्देश असेल.

तरी सर्व अभ्यासाकांनी सहभाग नोंदवावा. ही विनंती.

# चर्चासत्राचे उपविषय

१. मराठवाड्याच्या विकासाचा ऐतिहासिक व समकालीन वेध

1. मराठवाड्याच्या विकासाची वाटचाल.
2. विकासातील प्रादेशिक असमतोल
3. मराठवाड्याच्या विकासाचे बदलते संदर्भ
4. भविष्यातील विकासाचा रोडमॅप
5. धोरणनिर्मितीतील प्रादेशिक विकासाचा दृष्टिकोन

२. मराठवाडयातील शेती, जलसंधारण आणि ग्रामीण विकास

1. मराठवाड्यातील दुष्काळ व जलसंकट
2. जलसंधारण व शाश्वत पाणी व्यवस्थापन
3. आधुनिक व शाश्वत शेती
4. कृषी प्रक्रिया उद्योग व मूल्यवर्धन
5. शेतकरी उत्पादक कंपन्या व ग्रामीण अर्थव्यवस्था

३. मराठवाडयातील उद्योग, रोजगार आणि उद्योजकता

1. मराठवाड्यातील औद्योगिकीकरणाची सद्यस्थिती
2. स्थानिक संसाधनांवर आधारित उद्योग
3. युवकांसाठी रोजगारनिर्मिती
4. स्टार्टअप, कौशल्य विकास आणि उद्योजकता
5. MSME क्षेत्राच्या विकासाच्या संधी

४. मराठवाडयातील शिक्षण, कौशल्य विकास आणि मानवी भांडवल

1. मराठवाडयातील उच्च शिक्षणातील संधी व आव्हाने
2. मराठवाड्यातील प्राथमिक,माध्यमिक व उच्च्चमध्यामिक शिक्षणाची सद्यस्थिती
3. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) आणि मराठवाडा
4. मराठवाडयातील रोजगाराभिमुख व कौशल्याधारित शिक्षण
5. मराठवाडयातील डिजिटल शिक्षण व तंत्रज्ञानाचा वापर

५. मराठवाडयातील आरोग्य, पोषण आणि सामाजिक विकास

1. ग्रामीण आरोग्य व्यवस्थेची आव्हाने
2. माता व बाल आरोग्य
3. पोषण व सार्वजनिक आरोग्य
4. आरोग्य सुविधांचे विकेंद्रीकरण
5. डिजिटल हेल्थ व टेलिमेडिसिन

६. मराठवाडयातील महिला सक्षमीकरण आणि समावेशक विकास

1. महिला शिक्षण व आर्थिक स्वावलंबन
2. महिला उद्योजकतेच्या संधी
3. स्वयं-सहायता बचत गटांची भूमिका
4. सामाजिक न्याय आणि समावेशक विकास
5. वंचित व दुर्बल घटकांचा विकास

७. मराठवाड्याची अर्थव्यवस्था आणि प्रादेशिक विकास

1. मराठवाड्याच्या अर्थव्यवस्थेचे स्वरूप
2. प्रादेशिक असमतोलाची कारणे
3. गुंतवणूक आकर्षित करण्याच्या संधी
4. स्थानिक अर्थव्यवस्था आणि रोजगार
5. संतुलित प्रादेशिक विकासाचे धोरण

८. मराठवाडयातील पायाभूत सुविधा आणि शहरी विकास

1. रस्ते, रेल्वे व दळणवळण व्यवस्था
2. शहरीकरणाची आव्हाने
3. स्मार्ट व शाश्वत शहरे
4. ग्रामीण-शहरी दरी कमी करण्याचे उपाय
5. डिजिटल पायाभूत सुविधा

९. मराठवाडयातील पर्यावरण, हवामान बदल आणि शाश्वत विकास

1. हवामान बदलाचा मराठवाड्यावर परिणाम
2. पाणी, जमीन व जैवविविधतेचे संवर्धन
3. दुष्काळ व्यवस्थापन
4. हरित विकास आणि अक्षय ऊर्जा
5. शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs) आणि मराठवाडा

१०. मराठवाडयातील पर्यटन, वारसा आणि सांस्कृतिक विकास

1. अजिंठा-वेरूळ व इतर ऐतिहासिक वारसा
2. धार्मिक पर्यटनाच्या संधी
3. ग्रामीण व कृषी पर्यटन
4. मराठवाड्याची लोकसंस्कृती व लोककला
5. पर्यटनातून रोजगारनिर्मिती

११. मराठवाडयातील तंत्रज्ञान, डिजिटल परिवर्तन आणि मराठवाडा

1. डिजिटल इंडिया आणि ग्रामीण मराठवाडा
2. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि रोजगार
3. ई-गव्हर्नन्स
4. डिजिटल शिक्षण व डिजिटल साक्षरता
5. तंत्रज्ञानाधारित कृषी व उद्योग

१२. मराठवाडयातील युवा शक्ती आणि भविष्याचा मराठवाडा

1. युवकांचे शिक्षण व रोजगार
2. युवा नेतृत्व विकास
3. कौशल्य, नवोपक्रम आणि स्टार्टअप
4. युवकांचा सामाजिक विकासातील सहभाग
5. 2047 च्या विकसित भारताच्या निर्मितीत मराठवाड्याची भूमिका

१३. मराठवाडयातील ग्रंथालय चळवळ

1. मराठवाडयाच्या विकासात सार्वजनिक ग्रंथालयांची भूमिका
2. मराठवाडयातील वाचन संस्कृती आणि सामाजिक परिवर्तन
3. मराठवाडयातील ग्रंथालये आणि शैक्षणिक विकास
4. मराठवाडयातील ई-ग्रंथालये, डिजिटल संसाधने आणि माहिती साक्षरता
5. मराठवाडयातील ग्रंथालय चळवळीचे प्रश्न, आव्हाने आणि भविष्यातील दिशा

| | |
|---|---|
| | |

## शोधनिबंध सादरीकरणासाठी आवाहन

राज्यस्तरीय चर्चासत्राच्या मध्यावर्तीय विषयाशी संबंधित वरीलपैकी कोणत्याही उपविषयावर मौलिक व संशोधनाधारित शोधनिबंध सादर करण्यासाठी प्राध्यापक, संशोधक, संशोधक विद्यार्थी, शिक्षणतज्ज्ञ व विद्यार्थ्यांना आमंत्रित करण्यात येत आहे. सादर होणारे शोधनिबंध संशोधनात्मक, संदर्भाधारित व विषयाशी सुसंगत असावेत. निवडक शोधनिबंधांचे ISBN प्राप्त संपादित पुस्तक /Seminar Proceedings मध्ये प्रकाशन करण्यात येईल.

**सारांश पाठविण्याबाबत सूचना**

1. मौलिक व संशोधनाधारित शोधनिबंधांचे सारांश (250–300 शब्द) मराठी / हिंदी / इंग्रजी भाषेत दिनांक ३१ ऑगस्ट २०२६ व पूर्ण शोधनिबंध १५ सप्टेंबर२०२६पर्यंत पाठवावा. निवडक शोधनिबंध प्रकाशित केले जातील.
2. सारांश हा चर्चासत्राच्या मध्यवर्ती विषयाशी किंवा दिलेल्या उपविषयांशी संबंधित असावा.
3. सारांश मौलिक, संशोधनाधारित व विषयाशी सुसंगत असावा.
4. सारांशाची शब्दमर्यादा 250 ते 300 शब्द असावी.
5. सारांशासोबत शोधनिबंधाचे शीर्षक, लेखकाचे नाव, पद, विभाग, महाविद्यालय/संस्था, ई-मेल व मोबाईल क्रमांक नमूद करावा.सारांश मराठी / हिंदी / इंग्रजी भाषेत पाठविता येईल.
6. निवड झालेल्या सारांशांच्या लेखकांना पूर्ण शोधनिबंध सादरीकरणाबाबत स्वतंत्र सूचना देण्यात येईल.
7. निवडक शोधनिबंधांचे ISBN प्राप्त संपादित ग्रंथ / Seminar Proceedings मध्ये प्रकाशन करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

**सारांश पाठविण्यासाठी गुगल फॉर्म वापरावा:** https://forms.gle/BLC7a8UDoHaRh1Q27

**संपर्कासाठी: प्रा प्रदीप इंगोले ९८६०५९९४९८ डॉ. उद्धव राउत ७६२०२०४३३७ डॉ सविता दांडेगावकर ८०८७१६१६९४ प्रा डॉ रजिया शेख ८८८८६६२३४१ डॉ स्वाती पाटील ८३२९८६८७३८ डॉ सीमा भोसले ८२७५९४९०४२ प्रा. शिवराज यलपलवाड ७९७२०००००४० तांत्रिक बाबीसाठी संपर्क: प्रा. अमोल बरुडे ९५११२८२१८७**




**शोधनिबंध व चर्चासत्राचे शुल्क : १००० रु**

**फोन पे: 7774972002**

आपला सहभाग मराठवाड्याच्या विकासाच्या व्यापक राज्यस्तरीय चर्चेला अधिक समृद्ध, संशोधनाधारित आणि दिशादर्शक ठरेल, असा विश्वास आहे.

## ⚛आयोजक⚛

**डॉ दिलीप चव्हाण**
समन्वयक
डॉ शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्र, स्वा.रा.ती.म. विद्यावीठ, नांदेड

**डॉ मा मा जाधव**
प्राचार्य
बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत

**डॉ शारदा कदम**
समन्वयक
चर्चासत्र
मो ९५२७७३४८००

**डॉ नरसिंग पिंपरणे**
समन्वयक
अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष
मो ९९७०८८७७४४